ePaper

# वंचितला नव्या पार्टनरची गरज, युती किंवा आघाडीचे पर्याय खुले, प्रकाश आंबेडकरांचा मोठा निर्णय



| वर्ष - 6 | अंक - 45 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पुण्यात राजगर्जना होणारच, सभेची तारीख ठरली
- महापालिका निवडणूक आरक्षण लोकसंख्येच्या टक्केवारी नुसार
- कैद्यांनी चांगली पुस्तके वाचल्यास...

www.mahaenews.com | शुक्रवार , दिनांक 20 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



गिरणी कामगारांना येत्या सहा महिने ते दोन वर्षात एमएमआरडीए क्षेत्रात ३०० ते ४५० चौरस फूटांची ७५ हजार घरे देण्यात येतील. यापैकी काही घरेही तयार आहेत. या घरांच्या किंमती परवडणाऱ्या असतील. तयार घरांची पहाणी कामगार संघटनांनी करावी. कामगार संघटनांच्या प्रतिनिधींना ही घरे पहाण्याची व्यवस्था येत्या चार दिवसात म्हाडाने करावी. ही घरे गिरणी कामगरांच्या पसंतीस उतरली तर या घरांच्या किंमती कामगार संघटनाना विश्वासात घेऊन ठरविली जाईल आणि ती किंमत कमीत कमी असतील.

**- जितेंद्र आव्हाड,** गृहनिर्माण मंत्री

बालगंधर्वच्या पुनर्विकासाच्या दोन वर्षांच्या कालावधीत नाट्यरसिकांना आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कलाकारांना, नाट्यगृहापासून वंचित राहावे लागणार असल्याची भीती आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने शहरातील इतर खासगी नाट्यगृह चालकांशी चर्चा करून, यावर तोडगा काढावा. किमान पुनर्विकासाचे काम पूर्ण होईपर्यंत अत्यल्प दरात महापालिकेसह खासगी नाट्यगृहे नाट्यरसिकांसाठी उपलब्ध करून द्यावीत. बालगंधर्व नाट्यगृहाचा पुनर्विकास अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात येणार असल्यामुळे, पुणे शहराच्या सौंदर्यात भरच पडणार आहे.

**चंद्रकांत पाटील,** प्रदेशाध्यक्ष, भाजप



### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

# भाजपच्या भ्रष्टाचाराचा बुरखा शिवसेना फाडणार!

## शिवसेना पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सचिन अहिर यांचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज ।

शिवसेना पक्षप्रमुख तथा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना महामारीत केलेल्या कामगिरीची दखल महाराष्ट्रानेच नव्हे तर जगानेही घेतली आहे. पक्षसंघटनेची ताकद, मुख्यमंत्र्यांनी घेतलेले जनहिताचे निर्णय हे शिवसैनिकांसाठी जमेच्या बाजू आहेत. येत्या महापालिका निवडणुकीत शिवसेनेचा भगवा पिंपरी - चिंचवड महापालिकेवर फडकणार असून शिवसैनिकांनी आतापासून कामाला लागावे, असे आवाहन शिवसेना पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सचिन अहिर यांनी केले. तसेच भाजपने पिंपरी - चिंचवड महापालिकेत सत्ता उपभोगताना भ्रष्टाचाराची परिसीमा गाठली.





*आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात पार पडली.*

खाबुगिरीचा उच्चांक गाठत इतिहास रचल्याचा आरोप करत भाजपच्या भ्रष्टाचाराचा बुरखा फाडण्यासाठी शिवसेना बुरखा फाडो आंदोलन हाती घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिका-यांची आढावा बैठक पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात पार पडली. त्यावेळी सचिन अहिर बोलत होते. या बैठकीस शिवसेना खासदार श्रीरंग बारणे, उपनेते - पश्चिम महाराष्ट्र समन्वयक रवींद्र मिर्लेकर, सहसंपर्कप्रमुख आदित्य शिरोडकर, आदी उपस्थित होते.

सचिन अहिर म्हणाले, "आगामी महापालिका निवडणूकीत शिवसेनेचा विजय निश्चित आहे. त्यासाठी सर्व पदाधिका-यांनी, गटप्रमुखांनी, शाखाप्रमुखांनी, शिवसैनिकांनी कामाला लागायला हवे. आपापसातील हेवेदावे, आरोप - प्रत्यारोप विसरुन एकदिलाने काम केले पाहिजे. शिवसेनेमध्ये गटप्रमुख हा पक्षाचा पाया असून तोच स्टार प्रचारक आहे. गटप्रमुख हाच मतदार आणि उमेदवार यांच्यातील महत्वाचा दुवा आहे. सर्व गटप्रमुखांनी दैनंदिन नियोजन करावे आणि विभागप्रमुखांनी आठवड्यातून एकदा त्याचा आढावा घ्यावा".

### बुरखा फाडो आंदोलन शिवसेना घेणार हाती

▶ भाजपच्या ताब्यातील पिंपरी महापालिकेच्या भ्रष्टाचाराच्या सुरस कथा मुंबईतच नव्हे तर दिल्लीतही चवीचवीने चर्चिल्या जात आहे. केवळ 'श्रीमंत' महापालिकेतच नव्हे तर स्मार्ट सिटी प्रकल्पातही भाजपने 300 ते 400 कोटींचा गफला केल्याचा आरोप आहे. नैतिकतेचा आव आणणा-या भाजपच्या भ्रष्टाचाराचा बुरखा शिवसैनिकांनी जाहीरपणे फाडला पाहिजे. त्यासाठी शिवसेना बुरखा फाडो आंदोलन हाती घेणार असल्याची घोषणा जिल्हा संपर्कप्रमुख सचिन अहिर यांनी केली.

# पुणे जिल्ह्यावर काळाचा घाला : चासकमानमध्ये ४ विद्यार्थी तर भाटघर धरणात ५ महिलांचा बुडून मृत्यू

## जिल्ह्यात एकाच वेळी या दोन घटना घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे

। खेड/पुणे । महाईन्यूज ।

खेड तालुक्यातील चासकमान धरणाच्या जलाशयात सह्याद्री स्कूलचे पोहायला गेलेले ४ विद्यार्थी बुडून मृत्यू पावल्याची घटना घडली आहे. या बाबत खेड पोलीस पुढील



तपास करत आहेत. गुंडाळवाडी येथील तिवई हिल येथे सह्याद्री हे इंटरनॅशनल स्कूल असून येथे निवासी विद्यार्थी आहेत. शुक्रवार पासून शाळेला सुट्टी लागणार असल्याने शिक्षकांसह ३४ विद्यार्थी पोहण्याचा सराव करण्यासाठी तिवई हिलच्या पायथ्याशी असणाऱ्या चास कमान धरणाच्या जलाशयात गेले होते. शिक्षकांच्या म्हणण्या नुसार कांही विद्यार्थी कमरे एवढ्या पाण्यात उभे असताना एक मोठी लाट आल्याने या लाटेत ६ ते ७ विद्यार्थी पाण्यात ओढले गेले. या वेळी शिक्षकांनी तातडीने विद्यार्थ्यांना वाचविण्यासाठी प्रयत्न करत काही विद्यार्थी तीरावर आणले.

▶ मात्र, त्यातील ४ विद्यार्थी खोल पाण्यात बुडाले. या मध्ये परीक्षित अग्रवाल, रितीन डीडी हि २ मुले तर तनिशा देसाई व नव्या भोसले या २ विध्यार्थिनी बुडाल्या. या घटनेची माहित कळताच स्थानिक नागरिकांनी पाण्यात उड्या घेत विध्यार्थ्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. रात्री उशिरा पर्यंत सर्व चारही मृतदेह स्थानिकांनी बाहेर काढले. याबाबत खेड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक सतीश गुरव यासह त्यांचे सहकाऱ्यांनी घटना स्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात ठेवली. चारही मुले उच्च सोसायटी वर्गातील परराज्यातील असल्याची माहिती आहे.

### 21 तारखेची सभा आता 22 मे रोजी सायंकाळी 7 वाजता होणार

# पुण्यात राजगर्जना होणारच, सभेची तारीख ठरली!

## सभेचे ठिकाण पुण्याच्या स्वारगेट परिसरातील गणेश कला क्रीडा रंगमंच

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पुण्यातील सभेची तारीख ठरली आहे. राज यांची २१ तारखेची (शनिवारी) सभा आता २२ मे रोजी (रविवारी) होणार आहे. पुण्याच्या स्वारगेट परिसरातील गणेश कला क्रीडा रंगमंच इथे राज ठाकरे यांची सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास जाहीर सभा होईल, अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली आहे.

अयोध्या दौऱ्याआधी राज ठाकरे पुण्यात जाहीर सभा घेणार आहेत. पहिल्यांदा २१ मे रोजी राज ठाकरे यांच्या सभेचं नदीपात्रात आयोजन करण्यात आलं. पण पावसाची शक्यता लक्षात घेता सभेचं नियोजन बदलून आता ती सभा रविवारी २२ मे रोजी गणेश कला क्रीडा रंगमंच इथे होणार आहे.

### राज ठाकरेंचा अयोध्या दौरा

राज ठाकरे येत्या ५ जूनला अयोध्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यांच्या अयोध्या दौऱ्याला भाजप खासदार बृजभूषण सिंह यांच्यासह अयोध्येतील निवडक साधू संतांनी विरोध केला आहे. बृजभूषण सिंह तर विरोधाची धार दिवसेंदिवस तीव्र करत आहेत. याच सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे पुण्यातील सभेत रोखठोकपणे भाष्य करण्याची शक्यता आहे.

### ...म्हणून राज ठाकरेंच्या सभेची तारीख व ठिकाण बदललं



राज ठाकरे आपला दोन दिवसीय पुणे दौरा संपवून कालच मुंबईमध्ये आले. आज मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांची पुण्याच्या जाहीर सभेबाबत चर्चा झाली. राज ठाकरे यांना अयोध्या दौऱ्याआधी खूप विषयांवर बोलायचे आहे. म्हणूनच या सभेचं आयोजन केलेलं आहे. २१ तारखेची नदीपात्रातील सभा, त्यात पावसाचा धोका लक्षात घेऊन ती सभा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. जर तिथेच सभा घेतली असती आणि पाऊस आला असता तर हजारो लोकांचा हिरमूड झाला असता. त्यापेक्षा राज ठाकरे यांची परवानगी घेऊन मनसे पदाधिकाऱ्यांनी सभेची तारीख आणि ठिकाण बदलण्याचा निर्णय घेतल्याचं बाळा नांदगावकर म्हणाले.

# मनसे कार्यालयात कार्यकर्ते एकमेकांना भिडले

## पुणे मनसेत मोठी गटबाजी उघड



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

पुणे मनसेत गटबाजी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. मनसेच्या मध्यवर्ती कार्यालयात कार्यकर्ते भिडल्याचा प्रकार समोर आला आहे. (PUNE MNS RADA) दरम्यान, हा वाद अयोध्ये दौऱ्यासंबंधी नावनोंदणी आणि सभेच्या नियोजनाच्या बैठकीदरम्यान उफाळून आला आहे.

बैठकांना बोलावत नसल्याच्या रागातून शिवाजीनगरचे विभाग अध्यक्ष रणजित शिरोळे आणि विद्यार्थी सेनेचे शैलेश विटकर एकमेकांना भिडले. रणजित शिरोळे विभाग अध्यक्ष असून कुठल्याच बैठकांना का बोलावत नाही याचा जाब विटकर यांनी बैठकीत विचारल्यावर शिरोळे धावून गेले. त्यानंतर दोघांमध्ये झटापट झाली. अयोध्ये दौऱ्यासंबंधी नावनोंदणी आणि सभेच्या नियोजनाच्या बैठकीदरम्यान हा वाद झाला आहे. पुणे मनसेच्या मध्यवर्ती कार्यालयात कार्यकर्ते भिडल्यानंतर एकच गोंधळ निर्माण झाला. सभेबाबतची बैठक होती. यावेळी शिवाजीनगरचे विभाग अध्यक्ष आणि मनसैनिकामध्ये झटापट पाहायला मिळाली. शिवाजीनगरचे विभाग अध्यक्ष रणजित शिरोळे आणि विद्यार्थी सेनेचे शैलेश विटकर यांचा मनसे कार्यालयात राडा झाला. रणजित शिरोळे विभाग अध्यक्ष असून कुठल्याच बैठकांना का बोलावत नाही, याचा जाब विटकर यांनी बैठकीत विचारल्यावर शिरोळे धावून गेले. त्यानंतर दोघांमध्ये झटापट झाली.

# पुणे महापालिकेचे SC आणि ST प्रवर्गाचे आरक्षण जाहीर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

पुणे महापालिकेच्या (PMC) आगामी निवडणुकीसाठी अनुसुचित जाती (SC) आणि अनुसुचित जमातीसाठी (ST) आरक्षित ५८ प्रभागांमधील आरक्षण बुधवारी (ता.18 मे) जाहीर करण्यात आले. यामध्ये एकून 173 जागांपैकी अनुसुचित जाती प्रवर्गासाठी २३ आणि अनुसुचित जमातीसाठी प्रवर्गाच्या २ जागांचा समावेश आहे. त्यामुळे आता महिला आरक्षण सोडतीकडे लक्ष लागले असून त्यानंतरच प्रभागांचे चित्र स्पष्ट होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने महापालिकांची अंतिम प्रभाग रचना आणि नकाशे गेल्या आठवड्यात जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर पुणे पालिकेकडून बुधवारी रात्री उशीराने संकेतस्थळावर ५८ प्रभागांमधील अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीसाठी प्रवर्गांचे आरक्षण जाहीर करण्यात आले. इतर मागासवर्गाचे आरक्षण न्यायालयाने रद्द ठरविल्यामुळे प्रशासनाकडून फक्त अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीसाठीच्या प्रवर्गांचेच आरक्षण निश्चित केलेले आहे.

संबधित प्रभागातील 2011 च्या लोकसंख्येनुसार 35 लाख 56 हजार 824 इतकी लोकसंख्या निवडणूक आयोगाने गृहीत धरली असून एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती प्रवर्गाच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार हे आरक्षण निश्चित केले आले. आता ज्या प्रभागांमध्ये हे आरक्षण निश्चित झाले. त्यामध्ये महिला आरक्षण जाहीर झाल्यानंतरच नक्की कोणती जागा महिला अनुसुचित जाती, जमातीसाठी आहे याबाबतचे चित्र स्पष्ट होणार आहे.

### पुणे महापालिकेचे 3 वेळा नगरसेवक असलेल्या देशपांडे यांच्यावर शिवसेनेकडून कारवाईचा बडगा

# उद्धव ठाकरेंच्या भाषणावर ताशेरे ओढणाऱ्या शाम देशपांडेंची शिवसेनेतून हकालपट्टी!

## शाम देशपांडे 1972 पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघात होते कार्यरत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केल्याने नाराजी व्यक्त करणारे पुण्यातील नेते शाम देशपांडे यांची शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याचे शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून जाहीर करण्यात आले. उद्धव ठाकरे



यांच्या बीकेसीतील भाषणाच्या दुसऱ्याच दिवशी शाम देशपांडे यांनी जाहीरपणे पत्र लिहून नाराजी व्यक्त केली होती. तसेच आपण आजपासून शिवसेनेचे काम थांबवत असल्याचेही त्यांनी म्हटले होते. त्यानंतर शिवसेनेकडून देशपांडे यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

### शाम देशपांडे यांनी नेमकं काय म्हटलं होतं?

- शिवसेना-भाजपा युती तुटल्याने अनेक शिवसैनिकांना दु:ख होत आहे. त्यात उद्धव ठाकरे यांनी संघावर टीका केल्याने क्लेश होत आहे. भाजपाच्या पूर्वीही संघ होता. संघाला राजकारणात ओढण्याची गरज नव्हती असं माझं प्रामाणिक मत आहे. संघाला राजकारणात ओढून उद्धव ठाकरेंनी बेगडी धर्मनिरपेक्षतावाद्याचा पदर घट्ट धरला आहे अशीच माझी भावना आहे. संघाच्या हिंदुत्वाला आक्रमकतेची योग्य दिशा हिंदुह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी दिली. आज आरएसएसवर टीका करून ती दिशा भरकटली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला वादात ओढून उद्धव ठाकरेंनी काँग्रेसची री ओढली आहे. त्यामुळे आजपासून मी शिवसेना पक्षाचे काम थांबवत असल्याचे शाम देशपांडे यांनी पत्रकात म्हटले होते.
- शाम देशपांडे हा १९७२ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघात होते. नंतरच्या काळात त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. देशपांडे हे पुणे महापालिकेचे तीन वेळा नगरसेवक होते. शाम देशपांडे शिवसेनेकडून कोथरूडमधून निवडून आले होते.

### 'एससी, एसटीसाठी' प्रभाग लोकसंख्येच्या टक्केवारीवर

# महापालिका निवडणूक आरक्षण लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार!

## एकूण 46 प्रभाग 139 नगरसेवक संख्या असणार

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना नुकतीच प्रसिद्ध झाली असून आता प्रतिक्षा आरक्षण सोडत कधी होणार त्याची आहे. महापालिकेची 139 नगरसेवक संख्या असणार आहे. तर, एकूण 46 प्रभाग असणार आहेत. अनुसूचित जाती (एससी) साठी 22 तर अनुसूचित जमातीसाठी (एसटी) 3 जागा राखीव आहेत. 114 जागा सर्वसाधारण गटासाठी असतील. अनुसूचित जातींसाठी संभाव्य 22 प्रभागातील जागा राखीव राहू शकतात. हे आरक्षण लोकसंख्येच्या टक्केवारी नुसार उतरत्या क्रमाणे असणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जातींसाठी 16 टक्के आरक्षण आहे. त्यामुळे 139 सदस्यांच्या महापालिका सभागृहात 22 सदस्य असतील. त्यात महिला व पुरुष सदस्यांची संख्या प्रत्येकी 11 असणार आहे. तर, अनुसूचित जमातीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तीन टक्के आरक्षण आहे. त्यानुसार सध्यस्थितीत अनुसूचित जमातीतील सदस्य संख्या तीनच राहणार आहे. त्यांच्यासाठी प्रभाग 41, 44 आणि 6 हे प्रभाग आरक्षित असतील. त्यातील 41 आणि 44 या दोन प्रभागात एससी, एसटी दोन जागा राखीव राहतील. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील एका जागेसाठी मोठी चुरस होणार आहे. चऱ्होली, चिखली, इंद्रायणीनगर, प्रेमलोकपार्क सह आठ प्रभागात किरकोळ बदल



*पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग रचनेच्या प्रारूप आराखड्यास राज्य निवडणूक आयोगाने मंजुरी दिली असून अंतिम आराखडाही जाहीर झाला आहे. प्रारुप रचनेमध्ये केवळ चार बदल करण्यात आले आहेत. तब्बल 5 हजार 684 हरकती व सूचनांचा पाऊस पडल्यानंतरही मोजके बदल करण्यात आले असून बदलांसह अंतिम आराखडा महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामुळे इच्छुकांना नेमक्या कोणत्या परिसरात निवडणूक लढावयची आहे, हे स्पष्ट झाले आहे. तर चऱ्होली, चिखली, इंद्रायणीनगर, प्रेमलोकपार्क या प्रभागात किरकोळ फेरबदल करण्यात आलाय.*

# 'सारथी' व 'अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या' योजनांना भरीव निधी देणार

## पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी व्यक्त केला

पिंपरी । महाईन्यूज ।

'सारथी' व 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा'ने त्यांच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात, त्यांना योजनांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे, 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एम. व्ही. मोहिते, राजेंद्र कोंढरे, अनंत पवार, धनंजय जाधव, आप्पासाहेब कुढेकर, गंगाधर काळकुटे हे उपस्थित होते. बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री पवार यांनी, 'सारथी' व 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा'चे कामकाज प्रभावी करण्याच्या सूचना दिल्या.



'एमपीएससी'च्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात पहिल्या पाचपैकी 4, पहिल्या 10 पैकी 7, एकूण उत्तीर्ण 597 पैकी 198 उमेदवार 'सारथी' संस्थेचे आहेत. यावरुन 'सारथी'ची वाटचाल योग्य दिशेने सुरु असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'सारथी'च्या कामगिरीचे कौतुक केले. देशात, जगाच्या पाठीवर उद्योगक्षेत्राची गरज ओळखून रोजगार मिळवून देणारे अभ्यासक्रम तरुणांनी निवडावेत. प्रशिक्षणानंतर स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा. कृषी, उद्योग, आर्थिक क्षेत्राच्या गरजेनुसार कौशल्यविकासाचे अभ्यासक्रम निवडून पूर्ण करण्यासाठी 'सारथी'ने तरुणांना मदत करावी. राज्यातील तरुणांना रोजगार, उद्योग, व्यवसायात संधी देऊन यशस्वी होण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करेल असे अजित पवार म्हणाले.

### लाखो रुपये किमतीच्या किऑस्क मशिन वापराविना पडून

# 'किऑस्क' टोकन मशीन बनल्या शोभेपुरत्या

## मशिनरी योग्यरीत्या हाताळण्यात न आल्याने निरुपयोगी

पिंपरी । महाईन्यूज ।

19 मे : लसीकरण केंद्रावरील गोंधळ कमी करण्यासाठी महापालिकेने वर्षभरापूर्वी 'किऑस्क' टोकन पद्धतीचा अवलंब केला. परंतु सद्यःस्थितीत लाखो रुपये किमतीच्या किऑस्क मशिन वापराविना पडून आहेत. मशिनरी योग्यरीत्या हाताळण्यात न आल्याने निरुपयोगी ठरत आहेत. नागरिकांना टोकन घेण्यासाठी अडचणी उद्भवतात. बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना ते ऑपरेट करता येत नसल्यामुळे मशिन शोभेचे बाहुले बनले आहे.

शहरात मोफत कोव्हिड लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये उपलब्ध करून देताना प्रत्येक कार्यालयात आलेल्या लसीकरण केंद्रांद्वारे कार्यान्वित आहे. व्हॅक्सिनेशनच्या रजिस्ट्रेशनसाठी किऑस्क' टोकन मशिनचा उपयोग करण्यात येतो. या मशिनच्या माध्यमातून आरोग्य कर्मचाऱ्यांवरील ताण थोडा कमी होण्यासाठी प्रयत्न करण्यात आला होता. नागरिकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागू नये आणि प्रत्येकाचा वेळ वाचावा यासाठी तयार करण्यात आलेल्या मशिन सध्या वापराविना निरुपयोगी बनल्या आहेत. पिंपरी चिंचवड महापालीका भवन, आचार्य अत्रे रंगमदिराबाहेरील मशिन उपयोगाविना सध्या बंद स्थितीत आहेत. हीच परिस्थितीत शहरातील अन्य मशिनची आहे. लाखो रुपये मूल्याच्या या मशिनरी सध्या धूळखात पडल्या आहेत. या मशिनरीमध्ये तांत्रिक गोष्टी नागरीकांना समजत नसल्याने या मशीनकडे पाठ फिरवत आहेत.

> लसीकरणाच्या रजिस्ट्रेशनसाठी किऑक्स मशिन बसविल्या आहेत. पण त्या नागरीकांना हाताळता येत नाहीत. त्यामुळे त्यांचा नागरिक पुरेसा वापर करत नाहीये. त्याठिकाणी ऑपरेटरची मागणी होत आहे.
>
> -शिरीष पोरेड्डी,
> प्रवक्ता महापालिका



*पिंपरी चिंचवड महापालीका भवन येथील 'किऑस्क' टोकन मशिन उपयोगाविना सध्या बंद स्थितीत आहेत.*

### उपयोग कमी... त्रास जास्त...

काही ठिकाणची यंत्रे अद्यापही धूळ खात पडल्या आहेत. काही ठिकाणी टोकण देताना बंद पडते. तर काही यंत्रांमधून प्रिंट मिळत नाही, स्क्रिनवरचे बटण दाबल्यास अंक लवकर उमटत नाहीत, काहींना मोबाईलवर संदेश जातो, तर काहींना टोकणची प्रिंट मिळत नाही, अशा समस्या भेडसावतात. त्यामुळे काही ठिकाणीच गर्दी असते. काही ठिकाणी मार्गदर्शनासाठी महापालिकेने लिपिकांची नेमणूक करावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे. या पद्धतीनुसार कॉम्प्युटर प्रणालीद्वारे नागरिकांनी ते राहत असलेल्या ठिकाणी जवळ असणाऱ्या कोणत्याही क्षेत्रीय कार्यालयामध्ये येऊन आपला मोबाईल, जन्माचे वर्ष, प्रथम अथवा द्वितीय लस याबाबतची नोंद करायची आहे. त्यानंतर या मोबाईल क्रमांकावर उपलब्ध होणारा ओटीपी 'किऑस्क'मध्ये नोंदवून माहिती समाविष्ट करायची आहे. नोंद झाल्यानंतर नागरिकांस छापील टोकन प्राप्त होईल; तसेच टोकण क्रमांक एसएमएसद्वारे नागरिकांस पाठविण्यात येतो. पण बहुतांश नागरीकांना यंत्राची कार्यपद्धती सोपी असूनही लक्षात येत नाही. अशिक्षित नागरिकांना टोकन घेण्यासाठी अडचणी उद्भवतात. बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना ते ऑपरेट करता येत नसल्यामुळे मशिन शोभेचे बाहुले बनले आहे.

## संपादकीय »

# कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान!

***साऱ्या समाजाचे तोंड भूतकाळाकडे वळविण्यात काही तात्कालिक फायदे असतातही; मात्र हाच प्राचीन भारतीय संस्कृतीचा आत्मा आणि आविष्कार आहे का, याचा विचार करणे आवश्यक आहे.***

'इतिहास हा माणसांच्या आयुष्याशी जोडलेला असायला हवा आणि आपला इतिहास जाणून घेताना किंवा मांडताना आपण भूतकाळाचे गुलाम तर बनत नाही ना?' असा महत्त्वाचा प्रश्न विचारला होता. सध्या भारतात अचानक एखादी लाट किंवा वादळ यावे, तसे वाराणसी म्हणजे काशीतील ग्यानवापी मशिदीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पाठोपाठ, भगवान श्रीकृष्णाचे जन्मस्थान असणारी मथुरा आहे. त्यानंतरच्या यादीत आग्रा येथील ताजमहाल, राजधानीतील कुतुब मिनार किंवा श्रीरंगपट्टण येथे टिपू सुलतानाने बांधलेली मशीद हे येऊ शकतात. ही यादी कितीही वाढू शकते. काही हजार प्रार्थनास्थळे किंवा स्मारके तीत येऊ शकतील. इतिहासातील आक्रमणांचा असा हिशेब चुकता करीत बसले, तर पुढची शेकडो वर्षे तेच करत बसावे लागेल. साऱ्या समाजाचे तोंड भूतकाळाकडे वळविण्यात काही तात्कालिक फायदे असतातही; मात्र हाच प्राचीन भारतीय संस्कृतीचा आत्मा आणि आविष्कार आहे का, याचा विचार करणे आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अनेक शतके चाललेल्या अयोध्येतील विवादावर स्पष्ट निकाल दिला आणि त्या जागेवर आज भगवान श्रीरामाचे भव्य मंदिर उभे राहते आहे. ही अर्थातच समाधानाची बाब आहे. प्राचीन इतिहासातील विवादावर साऱ्या देशाने आधुनिक न्यायव्यवस्थेचा निर्णय मान्य केला आणि सरकारनेही तो अमलात आणण्यासाठी पावले टाकली. हा कायद्याच्या राज्याचा अंमल कोणालाही स्वागतार्ह वाटेल; मात्र १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंह राव सरकारने अयोध्येतील विवादास्पद जागा सोडून, देशातील सर्व धर्मस्थळांची, प्रार्थनास्थळांची स्थिती १५ ऑगस्ट १९४७ रोजी 'जशी होती तशीच' ठेवण्यासाठी कायदा केला आहे. तो आजही लागू आहे. असे असताना, आता या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले जाते आहे. मग हे आव्हान तेव्हाच का दिले गेले नाही? अयोध्येचा प्रश्न मार्गी लागला, की मग पुढचे एकेक प्रश्न हाती घेऊन सतत समाजमन उकळत ठेवण्याचा विचार असलाच,



## आनंदी सकाळ

# संतो, करमकी गति न्यारी।

'बगळ्याला शुभ्र रंग दिला अन् कोकिळा काळी केली. नदीला निर्मळ (गोड) जल तर समुद्र खारट केला, मूर्खाला राजपद तर पंडित भिकाऱ्यासारखे वणवण फिरतात. पण माझा प्रभू निर्गुण गिरीधर आहे. राजाजीला कोण विचारतो?' आपल्याला प्रश्न पडतो, 'माझ्याच वाट्याला हे भोग का?' तो लांड्यालबाड्या करूनही प्रतिष्ठित म्हणून मिरवतो अन् मी सरळ मार्गाने जाऊनही कष्ट, दुःख, चिंता, अपमान, उपेक्षा भोगत राहतो. असे का? मीराबाई समजावतात, 'ही कर्माची गती आहे. प्रारब्धाचे भोग आपण भोगतो.' पूर्वी केलेल्या वासनाजन्य कर्मांना संचित म्हणतात.

संचित भोगायला आले की प्रारब्ध म्हणतात. प्रारब्ध दोन प्रकारचे. अनाराभ्य आणि आरभ्य. जे आता भोगायला आले ते आरभ्य आणि अजून भोगायला यायचे आहे ते अनाराभ्य.

# इतिहासाचे भविष्य कुणीही हातात घेऊ नये !






वाराणसी हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मतदारसंघ आहे. मोदी यांनी काशीकडे सात-आठ वर्षांत बारकाईने लक्ष दिले आहे. तिला नवे, आधुनिक रूप दिले आहे. तेव्हा, हा ग्यानवापी मशिदीच्या परिसराचे पुन्हा सर्वेक्षण करण्याचा आणि या भागात शिवलिंग सापडल्याचा विषय त्यांच्या कानावर गेला नसेल, असे नाही. आता त्यांनी पुढाकार घेऊन संसदेने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी होईल, हे पाहिले पाहिजे. या कायद्याची घटनात्मक वैधता तपासायची असेल, तर सर्वोच्च न्यायालय कोणत्याही क्षणी घटनापीठाची निर्मिती करू शकते. तशी ती जरूर करावी; मात्र तोवर देशातील न्यायव्यवस्थेनेही ऐतिहासिक स्थळांच्या संदर्भात येणाऱ्या याचिका, खटले, दावे यांच्याकडे अतिशय गंभीरपणे आणि १९९१मधील कायद्याच्या प्रकाशातच पाहिले पाहिजे.

भारताचे स्वातंत्र्य कमालीचे रक्तरंजित होते. त्याची कल्पनाही आज येणार नाही. ते मिळाल्यानंतर भारताची जी नवरचना सुरू झाली, तेव्हाच भारताचा इतिहास; तसेच आक्रमकांच्या हल्ल्यात उद्ध्वस्त झालेली प्रार्थनास्थळे यांच्या संदर्भात राष्ट्रीय आयोग नेमण्याची गरज होती. ते झाले नाही. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकाराने बांधलेल्या सोमनाथच्या मंदिरात पंडित नेहरू यांचा विरोध पत्करून डॉ. राजेंद्र प्रसाद गेले होते. तेव्हा असे नवनिर्माण हा काही कुणाचा मक्ता नाही; मात्र आता या लढाया थांबविल्या पाहिजेत. त्या थांबविण्यात सर्वोच्च न्यायालयाची भूमिका मोलाची आहे. दोन समाज एकत्र आले आणि त्यांनी सामंजस्याने तडजोडी केल्या, तर देश अशांत होण्याचा प्रश्नच येणार नाही; मात्र असे होणार नाही. तसे होणे कुणालाही नको आहे. नाहीतर, खा. असदुद्दीन ओवैसी यांनी लगेच वाग्बाण सोडले नसते. आज काशी-मथुरेच्या कज्जेदलालीपासून दूर राहायचे आणि हवा तापली की त्यात उडी घ्यायची, असे मनसुबे कोणी बांधत असेल, तर त्यातही देशाचे नुकसान आहे. इतिहासाचे भविष्य असे कुणी आपल्या हातात घेऊ नये.

# 'काश्मीर ते कन्याकुमारी' भारत जोडो पदयात्रा...

**संघपरिवार, भाजपने हायजॅक केलेल्या लोकशाही संस्था, भाजपने हाताशी धरलेला मीडिया आणि भाजपने मोठे केलेले उद्योगपती यांच्या युतीविरोधातील आहे. आणि तो करायला काँग्रेस सज्ज आहे. त्यामुळे 'संवाद' पुनर्स्थापित करण्यासाठी काँग्रेस मैदानात उतरणार आहे हे चिंतन शिबिरात स्पष्ट झाले.**

स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसचा जन्म 'लोकचळवळ' म्हणून झालेला होता. तोच काँग्रेसचा 'डीएनए' आहे. काँग्रेस राष्ट्रबांधणी करू शकली कारण काँग्रेसचा 'संवादा'वर विश्वास होता आणि आहे. हा संवाद मग लोकांमधील असो किंवा विभिन्न पक्षांमधील असो किंवा राज्या-राज्यात वा केंद्र-राज्यात असो किंवा लोकशाही संस्थांमधील असो, तो भारतीय लोकशाहीचा आधार राहिलेला आहे. हा 'संवाद' संपतो तेव्हा हिंसेला सुरुवात होते. भाजपचे राजकारण हे 'संवाद' संपविणारे आहे. परिणामी 'हिंसेचे' पडसाद उमटू लागले आहेत. भाजपच्या राजकारणाविरोधातला संघर्ष हा फक्त भाजपविरोधातला नाही. तर संघपरिवार, भाजपने हायजॅक केलेल्या लोकशाही संस्था, भाजपने हाताशी धरलेला मीडिया आणि भाजपने मोठे केलेले उद्योगपती यांच्या युतीविरोधातील आहे. आणि तो करायला काँग्रेस सज्ज आहे. त्यामुळे 'संवाद'



पुनर्स्थापित करण्यासाठी काँग्रेस मैदानात उतरणार आहे हे चिंतन शिबिरात स्पष्ट झाले. 'भारत जोडो' हा त्याचा मूलमंत्र आहे. त्यामुळे थेट लोकांशी संवाद साधत त्यांना संघर्षाचा भाग बनविण्यासाठी या वर्षभरात काही मोठे कार्यक्रम काँग्रेसने चिंतन शिबिरात आखले आहेत. जूनपासून देशभरात 'जनजागरण अभियान' सुरू केले जाणार आहे. बेरोजगारी, महागाई अशा जनसामान्यांशी संबंधित गोष्टींचे जनजागरण केले जाईल. २ ऑक्टोबरपासून 'काश्मीर ते कन्याकुमारी' भारत जोडो पदयात्रा सुरू होईल.

भाजपची आर्थिक धोरणे लोकांच्या हिताविरोधी आहेत. मूठभर उद्योगपतींनाच गेल्या आठ वर्षांत 'अच्छे दिन' आले आहेत. घसरलेला विकास दर, महागाई, बेरोजगारी याने सामान्य माणसांचे हाल झाले आहेत. म्हणून अर्थनीतीचा नवसंकल्प काँग्रेसने मांडला आहे. यामध्ये सरकारी कंपन्यांच्या सरसकट खासगीकरणाला काँग्रेसने विरोध दर्शविला आहे. केंद्र-राज्ये वित्तीय संबंधाच्या पुनर्विलोकनाची भूमिका घेतली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सांडिला लौकिक लाज भय चिंता ।
रातलें अनंता चित्त माझें ॥२॥
मज आतां कोणी आळवाल झणी । तुका म्हणे कानीं बहिरी जालें ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### औरंगजेबाची कबर पर्यटनासाठी 5 दिवस बंद

। औरंगाबाद । महाईन्यूज । प्रतिनिधी।

जिल्ह्यातील खुल्ताबाद येथील मुघल बादशहा औरंगजेबाची कबर पाच दिवसांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भात पुरात्त्व विभागाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता औरंगाबादमध्ये येणाऱ्या पर्यटकांना ही कबर पहता येणार नाही. औरंगाबाद जिल्ह्यातील खुल्ताबाद येथील मुघल बादशहा औरंगजेबाची कबर पाच दिवसांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भात पुरात्त्व विभागाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता औरंगाबादमध्ये येणाऱ्या पर्यटकांना ही कबर पहता येणार नाही. एमआयएमचे तेलंगणाचे आमदार अकबरुद्दीन ओवैसी आणि औरंगाबादचे खासदार इम्तियाज जलील यांनी औरंगजेबाच्या कबरीचे दर्शन घेतले होते. त्यानंतर कबर परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झाले. यामुळे कबरीला काही अज्ञातांकडून धोका असल्याचे स्थानिकांचे म्हणणे होते.

### कैद्यांच्या भजन स्पर्धेचे अजित पवार आणि गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

# कैद्यांनी चांगली पुस्तके वाचल्यास त्यांच्यात बदल निश्चित – अजित पवार

### शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे कारागृहातील कैद्यांसाठी राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धा 2022चे आयोजन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानने कारागृहातील बंदिजनांसाठी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धा २०२२ चे आयोजन केले आहे. या स्पर्धेचे गुरूवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी अजित पवार यांनी "या स्पर्धेच्या माध्यमातून कैद्यांनी चांगली पुस्तके वाचली आणि आपल्या विचारात बदल घडवला तर, निश्चितपणे बदल होईल. तसंच, मोठ्याप्रमाणात आरोपी कमी झाल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळेल.", असे म्हटले.

"कैद्याची ज्यावेळी शिक्षा संपते त्यावेळेस तुरुंगातून बाहेर पडत असताना आपण केलेल्या कृत्याचे प्रायश्चित्त व्हावे, यासाठी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांसारख्या महान संतांनी अभंग, किर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून विचार सांगितलेले आहेत. त्यामुळे कैद्यांनी अशाप्रकारची चांगली पुस्तके वाचली आणि आपल्या विचारात बदल घडवला तर, निश्चितपणे बदल होईल. तसंच, मोठ्याप्रमाणात आरोपी कमी झाल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळेल.", असे अजित पवार यांनी कैद्यांच्या भजन स्पर्धेच्या उद्घाटनावेळी म्हटले.

देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि संस्थेच्या रौप्यमहोत्सवाचे निमित्त शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानने कारागृहातील कैद्यांसाठी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धा २०२२ चे आयोजन केले आहे. या स्पर्धेत एकूण २७ संघ सहभागी झाले आहेत. ही स्पर्धा २० ते ३० मे या कालावधीत प्रत्येक कारागृहात होणार आहे. कारागृहांमध्ये शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या कलागुणांना भक्तिमार्ग, अध्यात्म व भजनाद्वारे वाव मिळावा, बंदिजनांमध्ये सकारात्मक विचार वाढीस लागावे, थोडा विरंगुळा मिळावा, या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन केले आहे.

कैद्यांसाठी आयोजित केलेली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील एकमेव आणि पहिलीच स्पर्धा आहे, असा दावा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि स्पर्धाप्रमुख लक्ष्मीकांत खाबिया यांनी केला. त्यामुळे या भजन स्पर्धेच्या माध्यमातून कैद्यांमध्ये बदल घडणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



### कैंद्यांना मिळणारे पारितोषिक

- प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या संघास ज्ञानोबा-तुकाराम महाकरंडक आणि प्रमाणपत्र
- द्वितीय क्रमांकास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाकरंडक आणि प्रमाणपत्र
- तृतीय क्रमांकास संत शेख महंमद महाकरंडक आणि प्रमाणपत्र

### स्पर्धेत सहभागी कैद्यांना मिळणार...

प्रतिष्ठानचे सदस्य कारागृहात जाऊन स्पर्धेचे परिक्षण करणार आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना दिना आणि प्रकाश धारीवाल यांच्या वतीने स्व. सौ. कमलाबाई रसिकलाल धारीवाल यांच्या स्मरणार्थ हार्मोनियम, तबला, पखवाज, 10 जोडी टाळ, तुकोबांच्या अभंगाची पाच फूट बाय चार फूट आकाराची फ्रेम व प्रबोधनात्मक तसेच प्रेरणायादी 100 पुस्तकांचा संच देण्यात येणार आहे.

# OBC च्या राजकीय आरक्षणासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करणार!

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला विश्वास

मुंबई । महाईन्यूज ।

राजकारण न करता ओबीसींना राजकीय प्रतिनिधीत्व मिळालं पाहिजे. मध्य प्रदेशच्या धर्तीवर निर्णय व्हावा. सुप्रीम कोर्टाने काय निर्णय घ्यायचा हा त्यांचा अधिकार आहे. इम्पिरिकल डेटा सादर करण्यासाठी समिती नेमली आहे. ओबीसी आरक्षणात राजकारण नको. कुठल्याही परिस्थितीत शेवटपर्यंत ओबीसी समाजाला त्यांचे प्रतिनिधीत्व राहिले पाहिजे यासाठी मनापासून राज्य सरकार प्रयत्न करत आहे असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

अजित पवार म्हणाले की, सभागृहात एकमताने ओबीसी आरक्षणावर विधेयकं पास झाली,



वेगवेगळे विचार आले. राजकारण न आणता पुढे कार्यवाही करावी असं एकमत झाले. आत्ताच्या निवडणुका मध्य प्रदेशच्या धर्तीवर जो निर्णय झाला तशाच महाराष्ट्रात घ्याव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मतदानाच्या शेवटच्या घडीपर्यंत हे प्रयत्न सुरू राहतील. सुप्रीम कोर्ट हे सर्वोच्च आहे. न्याय व्यवस्थेने दिलेल्या निकालाचं स्वागत करतो. मध्य प्रदेशनं जसा इम्पिरिकल डेटा दिला तसा आम्ही पण देऊ आणि आमच्या बाजूने निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करतोय असं त्यांनी सांगितले.

### OBC आरक्षणाची ठाकरे सरकारनं राजकीय हत्या केलीय

मध्य प्रदेश सरकारनं सुप्रीम कोर्टात इम्पिरिकल डेटा सादर केल्यामुळे त्याठिकाणी ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याचे आदेश कोर्टाने दिला. सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय महाराष्ट्रातील सरकारच्या डोळ्यात अंजण घालण्याचं काम करेल. खोटे लोक खोटी माहिती देत आहेत. इम्पिरिकल डेटा सुप्रीम कोर्टात सादर करत नाही. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाची हत्या महाविकास आघाडी सरकारने केलीय असा आरोप विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला होता.

### नानांच्या विधानावर प्रतिक्रिया देण्यास अजितदादांचा नकार

वार्डरचना निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली झाली आहे. त्यांच्या सूचनेनुसार वार्डरचना करण्यात आली आहे. आयएएस अधिकाऱ्यांनी पडताळणी केली. त्यानंतर वार्ड रचनेची यादी प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे नाना पटोलेंच्या आरोपात किती तथ्य आहे त्याबाबत काही बोलायचं नाही असं सांगत अजित पवारांनी नाना पटोले यांच्या विधानावर भाष्य करणं टाळलं.

# आणि एका रात्रीत ते हिंदुत्ववादी झाले

### संजय राऊतांचा राज ठाकरेंना टोला

मुंबई । महाईन्यूज ।

राज ठाकरेंच्या नव्या भूमिकेमुळे तिकडच्या काही प्रमुख लोकांनी याबाबत काही प्रश्न विचारले असतील. मोदींना कांचनगिरीनी लिहिलेल्या पत्रावर संजय राऊत म्हणाले, या देशात साधू कोण आहेत. साक्षी

ठाकरे मनसेचे प्रमुख आहेत. त्यांनी उत्तर भारतीय आणि हिंदी भाषिकांच्या विरुद्ध मराठी माणसाच्या अस्मितेसाठी एक भूमिका घेतली होती. आणि एका रात्रीत ते हिंदुत्ववादी झाले आणि अयोध्येत जायला निघाले, असं शिवसेनेचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत म्हणालेत. संजय राऊतांनी दिल्लीत माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधलाय, त्यावेळी ते बोलत होते.



राज ठाकरेंच्या नव्या भूमिकेमुळे तिकडच्या काही प्रमुख लोकांनी याबाबत काही प्रश्न विचारले असतील. मोदींना कांचनगिरीनी लिहिलेल्या पत्रावर संजय राऊत म्हणाले, या देशात साधू कोण आहेत. साक्षी महाराज हे साधू आहेत का?, मनुष्य हाच साधू असतो. मनुष्याचा संस्कार हा त्याला साधू बनवतो. कोणी उठतो, जटा वाढवतो आणि भगवे ध्वज आणि कपडे घातलो म्हणून त्याला साधू म्हणावं का?, साधू वृत्तीनं आणि मनानं असावं लागते.

## शॉर्ट न्यूज »

### चीनच्या नापाक कारवाया सुरूच



महाईन्यूज । प्रतिनिधी।

लडाखमधील पँगॉन्ग लेकवर चीनच्या नापाक कारवाया थांबण्याचे नाव घेत नाहीत. चीनलडाखमधील महत्वाच्या पँगॉन्ग लेकवर पुन्हा एक नवा पुल बांधत आहे. अलीकडेच काही नवीन सॅटेलाईट फोटोंमधून हे समोर आले. या पुलाच्या माध्यमातून चीन पुन्हा एकदा LAC वर आपले वर्चस्व वाढण्याची योजना आखत आहे. यातून चिनी सैन्याला या प्रदेशात आपले सैन्य लवकर हलवण्यास मदत होणार आहे. याआधीही चीनने पँगॉन्ग लेकवर पूल बांधला आहे.

गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ पूर्व लडाखमधील अनेक तणावाच्या ठिकाणी भारत आणि चिनी सैन्यादरम्यान सुरु असलेल्या अडथळ्याच्या पार्श्वभूमीवर हा पूल बांधला जात आहे. या नवीन बांधणीबाबत भारतीय संरक्षण आस्थापनेकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया किंवा टिप्पणी आलेली नाही.

### आर्थिक महामारीच्या विळख्यात श्रीलंका...

# श्रीलंकेत अभूतपूर्व संकट!

## समुद्रात पेट्रोलचं जहाज उभं, पण घ्यायला पैसेच नाहीत

कोलंबो । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

श्रीलंकेमध्ये अभूतपूर्व अशी परिस्थिती उद्भवली असून, समुद्री क्षेत्रात जवळपास दोन महिन्यांपासून पेट्रोलनं भरलेलं जहाज उभं आहे, पण त्यांच्याकडे ते पेट्रोल घेण्यासाठी परकीय चलन नाही. विशेष म्हणजे सरकारनं सांगितलं की, डिझेलचा पुरेसा साठा आहे. ऑनलाईन पोर्टल न्यूजफर्स्ट डाट एलकेच्या रिपोर्टनुसार, वीज आणि ऊर्जामंत्री कंचना विजेसेकेरा यांनी संसदेला सांगितलं की, 28 मार्चपासून श्रीलंकेच्या समुद्री क्षेत्रात पेट्रोलच्या साठ्यानं भरलेलं एक जहाज उभं आहे, पण त्याचे पैसे देण्यासाठी श्रीलंकेकडे डॉलर उपलब्ध नाहीत.

तसेच जानेवारी 2022 मध्ये मागच्या खेपेचे त्याच जहाजाचे 5.3 कोटी डॉलर पैसे देणं बाकी आहे. मंत्र्यांनी सांगितलं की, शिपिंग कंपनीनं दोन्हीचे पैसे देत नाही, तोपर्यंत जहाज परत पाठवण्यास नकार दिला आहे. त्यामुळेच आम्ही लोकांना इंधनासाठी मोठी रांग लावू नका, असं आवाहन केलं आहे. डिझेलसंदर्भात कोणतीही समस्या नाही. आमच्याकडे पेट्रोलचाही मर्यादित साठा आहे आणि त्याला गरजेनुसार आवश्यक सेवा, विशेष स्वरूपात अँब्युलन्सला वितरित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### चीनकडून रेशन वाटपाचं राजकारण

☛ एएनआयच्या वृत्तानुसार, आवश्यक वस्तूंच्या तुटवड्यामुळे चीनकडून श्रीलंकेत अन्नधान्याचं वाटप केले जात आहेत. त्यामुळेही तिकडे असंतोष निर्माण झाला आहे. विदेशी अधिकाऱ्यांना प्रभावित करण्यासाठी चीन तांदूळ आणि डाळ सारखं धान्याच्या वाटपाचा दिखावा करत आहे. श्रीलंकेच्या गावांमध्ये चिनी सरकारकडून वाटण्यात येत असलेल्या रेशनच्या थैलींवर चिनी कम्युनिस्ट पार्टीचं चिन्ह आहे.



### इंधन आयातीसाठी 53 कोटी डॉलरची गरज


☛ सर्वच इंधन पंपांना पेट्रोल वितरीत करण्यासाठी शुक्रवारपासून तीन दिवस आणखी लागणार आहेत. जूनमध्ये श्रीलंकेला इंधन आयातीसाठी 53 कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे. त्यांना भारताकडून कर्ज सुविधा मिळत असली तरी दोन वर्षांपूर्वीच्या प्रतिमहिना 15 कोटी डॉलरच्या तुलनेत इंधन खरेदी करण्यासाठी 50 कोटी डॉलरची आवश्यकता आहे. श्रीलंकेत इंधनाच्या मागील आयात खेपेसाठी 70 कोटी डॉलरहून अधिक पैसे द्यावे लागले होते.

☛ श्रीलंकेचे माजी पंतप्रधान महिंदा राजपक्षे हे राजीनाम्याच्या नऊ दिवसांनंतर बुधवारी संसदेत पोहोचलेत. त्यांना समर्थकांच्या आणि सरकारच्या विरोधी पक्षांमध्ये झालेल्या झटापटीनंतर पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला होता.

# NIA कोर्टाने यासिन मलिकला टेरर फंडिंग प्रकरणात दोषी ठरवले

## विशेष न्यायाधीश प्रवीण सिंह यांच्या सुनावणीमध्ये मलिक ठरला दोषी

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



दिल्लीतील NIA न्यायालयाने काश्मीरमधील फुटीरतावादी नेता यासिन मलिकला टेरर फंडिंग प्रकरणात दोषी ठरवले आहे. मलिकने स्वतः कोर्टात आपल्या गुन्ह्याची कबुली दिली होती. मलिक याच्यावर दिल्लीच्या NIA उच्च न्यायालयात दहशतवादाशी संबंधित अनेक खटले दाखल आहेत, ज्यात बेकायदेशीर हालचाली प्रतिबंध कायदा (यूएपीए) समाविष्ट आहे. विशेष न्यायाधीश प्रवीण सिंह या खटल्याची सुनावणी करत होते ज्यात त्यांनी मलिकला दोषी ठरवले.

गेल्या सुनावणीत मोहम्मद यासीन मलिकने दिल्लीतील एनआयए कोर्टात दहशतवादाशी संबंधित त्याच्या सर्व गुन्ह्यांची कबुली दिली होती, त्यानंतर कोर्टाने सुनावणी 19 मेपर्यंत पुढे ढकलली होती. मलिक यानं कोर्टाला सांगितले की, मी माझ्यावरील सर्व आरोप स्वीकारणार आहे. त्याला आव्हान देणार नाही.

☛ गेल्या सुनावणीत मोहम्मद यासीन मलिकने दिल्लीतील एनआयए कोर्टात दहशतवादाशी संबंधित त्याच्या सर्व गुन्ह्यांची कबुली दिली होती, त्यानंतर कोर्टाने सुनावणी 19 मेपर्यंत पुढे ढकलली होती. मलिक यानं कोर्टाला सांगितले की, मी माझ्यावरील सर्व आरोप स्वीकारणार आहे.

☛ मलिकवर लावण्यात आलेल्या कलमांनुसार मलिकला जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. दरम्यान, विशेष न्यायालयाने काश्मिरी फुटीरतावादी फारुख अहमद दार उर्फबिट्टा कराटे, शाबीर शाह, मसरत आलम, मोहम्मद युसूफ शाह, आफताब अहमद शाह, अल्ताफ अहमद शाह, नईम खान, मोहम्मद अकबर खांडे, राजा मेहराजुद्दीन कलवाल, बशीर अहमद बट, जहूर अहमद शहा, वटाली, शाबीर अहमद शाह, अब्दुल रशीद शेख आणि नवलकिशोर कपूर यांच्याविरुद्ध आरोपपत्रे दाखल करून त्यांना अटक करण्याचे आदेश दिले आहेत.

# भारतीय वायुसेनेने चीनच्या PLA वायुसेनेला टाकले मागे



। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

एलएसीवर (LAC) सुरु असलेल्या सीमा वादात भारतासाठी एक आनंदाची बातमी समोर येत आहे. भारतीय वायुसेनेने वर्ल्ड डायरेक्टरी ऑफ मॉर्डन मिलिट्री एयरक्राफ्ट (WDMMA) ग्लोबल रेटिंगमध्ये चीनच्या पीएलए- एअर फोर्सला (PLA Air Force) मागे टाकले आहे. वर्ल्ड डिरेक्टरी ऑफ मॉडर्न मिलिटरी एअरक्राफ्टनुसार, (WDMMA) हे रँकिंग केवळ वायु दलाकडे असलेल्या विमानांच्या संख्येवर आधारित नाही तर आधुनिकीकरण, लॉजिस्टिक सपोर्ट, संरक्षण आणि हल्ल्याची क्षमता यावरही आधारित आहे.

WDMMA च्या 'ट्रू-व्हॅल्यू रेटिंग' (TVOR) मध्ये अमेरिकन वायुसेना प्रथम क्रमांकावर आहे.

# हार्दिक पटेल यांनी काँग्रेस सोडण्यामागे भाजपचाच हात!

## विधानसभा निवडणुकीपूर्वी हार्दिक पटेल यांचा काँग्रेसचा धक्का

। गांधीनगर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।


गुजरात काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष हार्दिक पटेल यांनी पक्षाला रामराम केला आहे. यामुळे काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. विधानसभा निवडणुकीआधी काँग्रेसला हा मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. पटेल हे भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू आहे. यातच पटेल यांनी काँग्रेस सोडण्यामागं भाजपचाच हात असल्याचा गौप्यस्फोट एका खासदारांनं केला आहे. यामुळं खळबळ उडाली आहे.



माजी केंद्रीय मंत्री व काँग्रेसचे खासदार शक्तिसिंह गोहिल यांनी हा दावा केला आहे. ते म्हणाले की, हार्दिक पटेल यांनी काँग्रेसवर केलेले आरोप हे पक्ष सोडणाऱ्या नेत्यानं केलेले हे आरोप नाहीत. हे सगळे भाजपने लिहून दिलेले आरोप आहेत. हा नेता केवळ ते मोठ्याने वाचून दाखवत आहे. भाजपने जर हे ठरवले नसते तर प्रत्येकाचे शब्द वेगळे असते. पक्षाच्या नेतृत्वाबद्दल बोलत असाल तर काही दिवसांपूर्वी राहुल गांधींसोबत तुम्ही मंचावर होतात. त्यांना भेटण्यापासून तुम्हाला कुणी थांबवलं होतं. आमच्या पक्षात अंतर्गत लोकशाही आहे. अंतर्गत लोकशाही आणि बेशिस्त यात धूसर रेषा आहे. भाजपमध्ये अंतर्गत लोकशाहीच नाही.हार्दिक पटेल यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्याचे ट्विट करीत जाहीर केले होते. ते म्हणाले होते की, आज मी मोठ्या धैर्याने काँग्रेस पक्षाच्या पदाचा आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. मला खात्री आहे की माझ्या निर्णयाचे माझे सर्व सहकारी आणि गुजरातची जनता स्वागत करेल.

### नवऱ्याची नसबंदी केल्यासारखी पक्षात अवस्था - हार्दिक

☛ काही दिवसांपूर्वी पटेल यांनी पक्षात दुर्लक्षित केले जात असल्याचा आरोप केला होता. नव्या नवऱ्याची नसबंदी केल्यासारखी माझी पक्षात अवस्था झाली आहे, असे वक्तव्य त्यांनी केलं होतं. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कार्यकारी अध्यक्षांनीच केलेल्या या आरोपांमुळे काँग्रेसमध्ये मोठी खळबळ उडाली होती. मात्र, काँग्रेस सोडण्याच्या चर्चेवर पटेल यांनी काँग्रेसमध्ये राहणार असल्याचे स्पष्ट केलं होतं.



# म्हणून प्रतिकशी लग्न करतेय - हता दुर्गुळे

मुंबई | अभिनेत्री हता दुर्गुळे हिनं अल्पावधीतच मालिकाविश्वात आपलं स्थान निर्माण केलंय. सध्या 'मन उडू उडू झालं' या मालिकेतून ती प्रेक्षकांच्या भेटीला येतेय. तसंच रंगभूमीवर तिची प्रमुख भूमिका असलेलं 'दादा एक गुड न्यूज आहे' हे नाटकही तुफान गाजतंय. काल म्हणजेच १८ मे रोजी लग्नाचे फोटो शेअर करत हतानं चाहत्यांना सुखद धक्का दिला. हतानं प्रतिक शाह याच्याशी लग्नगाठ बांधली. प्रतिक आणि हताच्या लग्नसोहळ्याला दोघांच्या जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी उपस्थित होते. गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात या दोघांचा साखरपुडा पार पडला होता. चाहत्यांनी दोघांवर शुभेच्छांचा वर्षाव केला होता. परंतु अनेकांनी हताला प्रतिकशी साखरपुडा केल्यानंतर ट्रोल केलं होतं. याचा खुलासा तिनं एका शोमध्ये केला होता. प्रतिकची आयुष्याचा जोडीदार म्हणून निवड केल्यानंतर हताला बऱ्याच जणांनी ट्रोल करण्याचा प्रयत्न केला. 'मराठी मुलगा तुला भेटला नाही का? असं म्हणत तिला ट्रोल केलं गेलं होतं. तर हिंदी मनोरंजन सृष्टीत काम करण्यासाठी तू प्रतिकशी लग्न करतेय, असंही अनेकांनी म्हटलं होतं.

# 'रानबाजार'चा ट्रेलर प्रदर्शित; आजपासून प्लॅनेट मराठीवर प्रेक्षकांच्या भेटीला...



गेल्या अनेक दिवसांपासून बहुप्रतिक्षित अभिजित पानसे लिखीत, दिग्दर्शित 'रानबाजार' वेबसीरिजची चर्चा सुरु आहे. मराठीमधील ही सगळ्यात बोल्ड सीरिज असल्याचं मानलं जात असून, या सीरिजचा टीझर, पोस्टर प्रदर्शित होताच लाखो प्रेक्षकांनी त्याला पसंती दिली.

त्यानंतर प्रेक्षकांना 'रानबाजार'च्या ट्रेलरची प्रतिक्षा होती. मात्र, आज या वेबसीरिजचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांची प्रतिक्षा संपली आहे. विशेष म्हणजे हा ट्रेलर प्रदर्शित होताच काही मिनिटांमध्येच 10 हजारपेक्षा अधिक लोकांनी पाहिला आहे. 'रानबाजार'च्या टिझरमधून तेजस्विनी पंडीत आणि प्राजक्ता माळीचा थक्क करणारा मादक अंदाज प्रेक्षकांनी नुकताच अनुभवला आहे.

पॅलिटिकल क्राईम थ्रिलर असलेल्या या वेबसीरिजची निर्मिती प्लॅनेट मराठी, अ व्हिस्टास मीडिया कॅपिटल कंपनी, रावण फ्युचर प्रॉडक्शन, अभिजीत पानसे आणि अनिता पालांडे यांनी केली असून ही भव्य वेबसीरिज 20 मेपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आजवर कधीही न पाहिलेले राजकारण, त्यातील धूर्त डावपेच, हनी ट्रॅप, उत्कंठा, नाट्यमय थरार हे सगळंच ट्रेलरमध्ये दिसत आहे. त्यामुळे 'रानबाजार'ची उत्सुकता आता अधिकच शिगेला पोहोचली आहे. आजवरच्या वेबविश्वात कदाचित कधीही न पाहिलेली कथा या वेबसीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे.



# म्हणून 'प्रयोग' असं म्हणतात -प्रशांत दामले

'सुख म्हणजे नक्की काय असतं' ह्या गाण्याच्या ओळी आठवल्यावर अभिनेते प्रशांत दामले हे डोळ्यांसमोर येतात. प्रशांत दामले यांनी आजपर्यंत आपल्या प्रत्येक गाण्याने, अभिनयाने आणि खवय्येगिरीने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. प्रशांत दामले हे सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असतात. नुकताच त्यांनी सोशल मीडियावर एका चाहत्याने त्यांच्या नाटकावरून विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिले आहे.

अभिनेते प्रशांत दामले यांनी सोशल मीडियावर नाटकाच्या प्रयोगासंदर्भात पोस्ट शेअर केली होती. त्यावर एका चाहत्याने नाटकाचे 'प्रयोग' का म्हणतात? असा प्रश्न विचारला होता. यावर त्यांनी "कारण प्रत्येक नाटक हा एक EXPERIMENT (प्रयोग).., कधीही काहीही चुकू शकत किंवा कधीही काहीही नवीन काहीतरी मिळू शकत", असे उत्तर प्रशांत दामले यांनी दिले आहे.

प्रशांत दामलेंच्या या उत्तरानंतर चाहत्यांनी चाहत्यांनी लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहेत. दरम्यान, प्रशांत दामले हे फेसबुकवर नेहमी सक्रीय असतात. अनेकदा त्यांच्या विविध नाटकांच्या प्रयोगांचे फोटो शेअर करत असतात. नुकतंच त्यांनी नाटकाच्या प्रयोगासंदर्भात पोस्ट शेअर केली होती. दरम्यान, प्रशांत दामले हे सध्या 'एका लग्नाची पुढची गोष्ट' या नाटकाच्या प्रयोगांमध्ये सोलापूर मध्ये व्यस्त आहेत. या नाटकात प्रशांत दामले यांच्यासोबत अभिनेत्या कविता मेढेकर या मुख्य भूमिकेत आहेत. त्याशिवाय किचन कल्लाकार या

# नाना पाटेकरांचा चुलीवर जेवण बनवतानाचा व्हिडिओ चर्चेत!



अभिनेते नाना पाटेकर यांनी हिंदी असो वा मराठी चित्रपटातून आपल्या दमदार अभिनयाने सर्वांच्याच मनावर स्वतःची एक वेगळी छाप पाडली आहे. चित्रपट कोणताही असो नाना पाटेकर यांचा त्यातला अभिनय आणि त्यांचे संवाद प्रेक्षकांच्या नेहमीच लक्षात राहतात. त्यांच्या अभिनयाच्या ताकदीवर अनेक चित्रपट हिट सुद्धा झाले आहेत.

गेली अनेक वर्षे ग्लॅमरस सिनेसृष्टीत असून सुद्धा नाना पाटेकर हे त्यांच्या खऱ्या खुऱ्या आयुष्यात मात्र अगदी साधेपणाने राहतात. शिवाय हा साधेपणा त्यांच्या व्यक्तित्वात दिसतो. दरम्यान, नाना पाटेकर हे आपल्या माणसांची आपुलकीने चौकशी करतात, काळजी घेतात. त्याचं उत्तम उदाहरण एका व्हिडिओच्या माध्यमातून समोर आले आहे.



# ज्ञानवापीमधील शिवलिंग सापडल्याच्या दाव्यावर कंगना रनौत म्हणाली....

देशात सुरु असलेल्या ज्ञानवापी मशीद वादाच्या पार्श्वभूमीवर बॉलिवूड अभिनेत्री कंगना रनौत वाराणसीला पोहोचली आहे. सध्या कंगना तिच्या आगामी धाकड चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. याचदरम्यान ती 'धाकड'च्या टीम आणि कलाकारांसह वाराणसीच्या काशी विश्वनाथ मंदिरात पोहतच जिथे दर्शन घेत प्रार्थना केली. यावेळी, जेव्हा मीडियाने कंगनाला ज्ञानवापी मशिदीत सापडलेल्या शिवलिंगाच्या दाव्यावर प्रश्न विचारला तेव्हा अभिनेत्रीने खुलेपणाने उत्तर दिले. आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखल्या जाणारी कंगना म्हणाली की, 'काशीच्या प्रत्येक कणात महादेव वसला आहे'. मीडियाच्या प्रश्नांना उत्तर देताना कंगना म्हणाली की, 'जसे मथुरेच्या प्रत्येक कणात भगवान कृष्ण आहे, अयोध्येच्या प्रत्येक कणात राम आहे, त्याचप्रमाणे काशीच्या प्रत्येक कणात महादेव आहे. त्यांना कोणत्याही संरचनेची आवश्यकता नाही. यानंतर कंगनाने हर हर महादेवचा नारा दिला. अभिनेत्रीचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. आजकाल कंगना राणौत वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन तिच्या चित्रपटाचे प्रमोशन करत आहे. काही दिवसांपूर्वी ही अभिनेत्री कपिल शर्माच्या 'द कपिल शर्मा' शोमध्ये पोहोचली होती. त्याचवेळी अभिनेत्री वाराणसीला पोहोचली आहे. कंगनाने तिच्या इंस्टाग्रामवर काही फोटो शेअर केले आहेत ज्यात ती काशी विश्वनाथ मंदिरात आरती करताना दिसत आहे. यावेळी त्याच्यासोबत त्याचे सहकलाकार अर्जुन रामपाल आणि दिव्या दत्ता देखील उपस्थित होते.

## शॉर्ट न्यूज »

### महिला जागतिक बॉक्सिंग स्पर्धा : निखत अंतिम फेरीत



**नवी दिल्ली । महाईन्यूज**

भारताच्या निखत झरीनने (५२ किलो) वर्चस्वपूर्ण विजयासह बुधवारी इस्तंबूल येथे चालू असलेल्या महिला जागतिक अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. उपांत्य फेरीत आव्हान संपुष्टात आल्यामुळे मनीषा मौन (५७ किलो) व परवीन हुडा (६३ किलो) यांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. उपांत्य सामन्यात निखतने आत्मविश्वासाने खेळ करीत ब्राझिलच्या कॅरोलिन डी अल्मेडाला ५-० असे सहज नामोहरम केले. कनिष्ठ विश्वविजेत्या निखतने संयमी खेळाचे प्रदर्शन करीत कॅरोलिनवर निर्विवाद वर्चस्व गाजवले. मनीषाने टोक्यो ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या इटलीच्या इरमा टेस्टाकडून ०-५ अशी हार पत्करली, तर परवीनने युरोपियन कांस्यपदक विजेत्या आर्यलडच्या एमी ब्रॉडहस्टकडून १-४ असा पराभव पत्करला. २०१९मध्ये आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या मनीषाने दुसऱ्यांदा जागतिक अजिंक्यपदासाठी प्रयत्नांची शर्थ केली.

### बीसीसीआयचा मोठा निर्णय

# आयपीएलच्या अंतिम सामन्याच्या वेळेत बदल

### 29 मे रोजी आयपीएल क्रिकेटचा अंतिम सामना

**। नवी दिल्ली । महाईन्यूज वृत्तसंस्था ।**

**आयपीएलचा** पंधरावा हंगाम शेवटच्या टप्प्यात आहे. गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या दोन संघांनी याआधीच प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. तर उरलेल्या संघांमध्ये प्लेऑफर्यंत पोहोचण्यासाठी चढाओढ रंगली आहे. असे असताना आता बीसीसीआयने अंतिम सामन्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. या सामन्याची वेळ बदलण्यात आली आहे.

येत्या २९ मे रोजी आयपीएल क्रिकेटचा अंतिम सामना खेळवला जाणार आहे. याआधी



या सामन्याची सुरुवात सायंकाळी ७.३० वाजता होणार होता. तर अर्ध्या तासाआधी म्हणजेच ७ वाजता नाणेफेक होणार होती. मात्र आता बीसीसीआयने या सामन्याची वेळ बदलण्याचा निर्णय घेतला असून सामना ७.३० ऐवजी अर्धा तसा उशिराने म्हणजेच ८ वाजता सुरु होण्याची शक्यता आहे. तर नाणेफेक ७.३० वाजता केली जाऊ शकते.

क्रिकबझने दिलेल्या माहितीनुसार बीसीसीआयकडून आयपीएलमध्ये पुन्हा एकदा ओपनिंग आणि क्लोजिंग शेरेमनी (उद्घाटन आणि समापन समारोह) आयोजित करण्याचा विचार केला जात आहे. या हंगामात उद्घाटन समारंभाचे आयोजन करता आले नाही. मात्र यावेळी समापन समारोह आयोजित केला जाणार आहे. हा समारोहाची सुरुवात ६.३० वाजता सुरु होणार असून तो ५० मिनिटांचा असेल. समापन समारोह संपल्यानंतर नाणेफेक आणि अंतिम सामन्याला सुरुवात होईल. याच कारणामुळे आयपीएलचा अंतिम सामना अर्धा तास उशिराने सुरु होणार आहे.

### केकेआरकडून सामना घेतला हिसकावून

दरम्यान, आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादमधील मोटेरा येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. सध्या प्लेऑफमध्ये लखनऊ आणि गुजरात या संघांनी आपले स्थान पक्के केले आहे. आणखी दोन संघाची प्लेऑफमध्ये निवड झाल्यानंतर एकूण चार संघांमध्ये प्लेऑफचे सामने खेळवले जातील. त्यानंतर टॉप दोन संघांमध्ये अंतिम सामना खेळवला जाईल.

# आयपीएल : सर्वात यशस्वी ठरलेले 'हे' तीन संघ स्पर्धेतून बाहेर

### चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स हे दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर

**नवी दिल्ली । महाईन्यूज**

**आयपीएलचे** यंदाचे पर्व शेवटच्या टप्प्यात आहे. मोजकेच सामने शिल्लक असल्यामुळे सर्वच संघ प्लेऑफर्यंत पोहोचण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहेत. काल (१८ मे) झालेल्या लखनऊ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट लायडर्स या सामन्यात लखनऊचा विजय झाल्यामुळे केकेआर संघ प्लेऑफच्या बाहेर पडला. केकेआरचे आव्हान संपुष्टात आले असून लखनऊने प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. यावेळी सर्वांनाच आश्चर्यचकित करुन टाकणारा खेळ लखनऊ आणि गुजरात या दोन संघांनी करुन दाखवली आहे. तर दुसरीकडे सर्वात यशस्वी मानले जाणारे चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स हे दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. त्याचरोबर लखनऊविरोधात खेळताना पराभव झाल्यामुळे केकेआर संघदेखील प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. यापूर्वीच्या हंगामांमध्ये तीन संघांपैकी एकतरी संघ प्लेऑफमध्ये राहिलेला आहे. मात्र यावेळी हे तिन्ही संघ प्लेऑफच्या बाहेर असतील. आयपीएलच्या इतिहासात असे कधीही झालेले नाही.



मुंबई इंडियन्स संघाने आतापर्यंत पाच वेळा जेतेपद पटकावलेले आहे. तर चेन्नई संघाने चार वेळा ट्रॉफी जिंकलेली आहे. केकेआर या संघानेदेखील दोन वेळा जेतेपद पटकावलेले आहे. हे तिन्ही संघ आतापर्यंत सर्वात यशस्वी ठरलेले संघ आहेत. मात्र या पर्वामध्ये चित्र काहीसे वेगळे आहे. यावेळी पदार्पणाच्या हंगामातच गुजरात आणि लखनऊ या दोन्ही नव्या संघांनी आपले प्लेऑफमधील स्थान निश्चित केले आहे. तर चेन्नई, मुंबई आणि केकेआर हे तिन्ही संघ पहिल्यांदाचा प्लेऑफमध्ये नसणार आहेत. यापूर्वी या तीन संघांपैकी एकतरी संघ प्लेऑफमध्ये राहिलेला आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही